पुण्य नगरी

## मलाही अटक करा - संभाजीराजे छत्रपती

(पान १ वरुन) त्यांनी राज्यभरातील कार्यकर्त्यांना विशाळगडावर हजर राहण्याचे आवाहन करून ते स्वतः कार्यकर्त्यांच्या ताफ्यासह गडावर कूच करून गेले. या वेळी पोलिसांनी चोख बंदोबस्त नेमला होता. मात्र, काही हुल्लडबाज कार्यकर्त्यांनी गजापूर या गावातील लोकांच्या घरावर दगडफेक, तोडफोड करून प्रापंचिक साहित्यांचे नुकसान केले.

## पूजा खेडकरांचे आई-वडील पसार

(पान १ वरुन) ठाण्यात खेडकर दाम्पत्यासह अंबादास खेडकर (रा. आंबी, ता. हवेली), तसेच त्यांच्या अंगरक्षकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत शेतकरी पांडुरंग पासलकर (६५, रा. केडगाव, आंबेगाव पुनर्वसन, ता. दौंड) यांनी पौड पोलीस ठाण्यात नुकतीच फिर्याद दिली. या गुन्ह्याच्या अनुषंगाने खेडकर दाम्पत्याचा जबाब नोंदवण्यासाठी त्यांना पौड पोलीस ठाण्यात बोलावण्यात आले होते.

## ..अखेर विशाळगडावरील अतिक्रमणांवर हातोडा

(पान १ वरुन) वर्षापासून गाजत आहे. गडावरील ऐतिहासिक जागेवर अतिक्रमण करून १५८ पेक्षा अधिक इमारती बांधल्या आहेत. गडावरील पुरातन इमारतीचे दगड काढून घराचे चौथरे बांधले आहेत. जागेचा वापर अवैद्य व्यवसायासाठी केला जात असल्याचा आरोपही होत होता. गडावरील अतिक्रमणावरून गेल्या अनेक वर्षापासून विविध संघटना आंदोलन करत होत्या.

## पवार-भुजबळ भेटीने खळबळ

(पान १ वरुन) नेत्यांनी या बैठकीवर बहिष्कार टाकला, असा आरोप त्यांनी पवार यांच्यावर केला होता. हा आरोप करून २४ तास व्हायच्या आधीच छगन भुजबळ हे सोमवारी सकाळीच 'सिल्व्हर ओक' या निवासस्थानी शरद पवार यांच्या भेटीसाठी गेले. कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा भेटीची वेळ न घेतला भुजबळ हे पवार यांच्या भेटीला गेल्यानंतर त्यांना लगेच भेट मिळाली नाही.

## पिंपरीतूनही दिव्यांग प्रमाणपत्र

(पान १ वरुन) ही बाब समोर आली. जिल्हा शासकीय रुग्णालयातून २०१८ मध्ये नेत्र दिव्यांग प्रमाणपत्र आणि २०२० मध्ये मानसिक आजारी असल्याचे प्रमाणपत्र दिले होते.

## पीक विमा भरण्यासाठी ३१ जुलैपर्यंत मुदतवाढ

विम्याचा अर्ज करण्यास मुदतवाढ मिळावी यासाठी राज्य शासनाचा कृषी विभाग आणि मंत्री धनंजय मुंडे याबाबत पाठपुरावा करीत होते.

## कॅम्लिनचे संस्थापक सुभाष दांडेकर यांचे निधन

दांडेकर यांनी उत्पादनांची गुणवत्ता व मूल्यांशी कधीच तडजोड केली नाही. काळानुसार बदलत गेलेल्या तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर करून सतत नवे प्रयोग करण्यावर त्यांनी भर दिला. त्यांच्या निधनानंतर एक उत्तम उद्योजक व रंगांचा जादूगार हरपल्याची भावना व्यक्त होत आहे. कर्मचाऱ्यांच्या हिताला आणि श्रमाला त्यांनी कायम महत्त्व दिले.


**महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा)**
सिटी सर्व्हे नं. २४९/अ-१/५५ ई वॉर्ड म्हाडा कॉम्प्लेक्स, नागाळा पार्क, जिल्हा परिषदेजवळ कोल्हापूर - ४१६००३
ई-मेल आयडी medakolhapur@mahaurja.com संकेतस्थळ (website) www.mahaurja.com

**ई-निविदा सूचना**

कोल्हापूर जिल्ह्यातील विविध दलित वस्तीमध्ये २०० वॅट क्षमतेचे ६ मीटर उंचीचे एकूण १९ नग एल. ई. डी. सौर हायमास्ट प्रकल्पांची आस्थापना व कार्यान्वित करणे व ५ वर्षांच्या हमी कालावधीत सुट्या भागांसह देखभाल व दुरुस्ती करणे (CMC) या कामासाठी संबंधित क्षेत्रातील उत्पादक /पुरवठादार/प्रकल्प विकासक यांच्याकडून ई-निविदा मागविण्यात येत आहे.

• निविदा दाखल करण्याचा अंतिम दिनांक व वेळ :- दि.२९/०७/२०२४ सायं. ६:०० वाजेपर्यंत

ई-निविदेच्या सविस्तर माहितीसाठी http//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर भेट द्यावी. या अंतर्गत प्राप्त होणाऱ्या निविदापैकी एक किंवा सर्व निविदा स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे सर्वाधिकार विभागीय महाव्यवस्थापक, महाऊर्जा, विभागीय कार्यालय, कोल्हापूर यांच्याकडे राहतील.

सही/-विभागीय महाव्यवस्थापक,
विभागीय कार्यालय, महाऊर्जा, कोल्हापूर



**नोटीस**

नियोजित मुरगूड नागरी सहकारी पतसंस्था मर्या., मुरगूड, ता. कागल, जि. कोल्हापूर या नियोजित संस्थेचा नोंदणीबाबतचा बँकेत खाते उघडणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयास दिनांक १२/०७/२०२४ रोजी प्राप्त झाला आहे. तरी उपरोक्त नियोजित संस्थेने तालुका कार्यक्षेत्र मागणी केली आहे. त्यामुळे तालुका / तालुक्यातील जिल्हा कार्यक्षेत्र असणाऱ्या सहकारी पत/ग्रामीण पतसंस्थांना या नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, नियोजित, मुरगूड नागरी सहकारी पतसंस्था मर्या., मुरगूड, ता. कागल, जि. कोल्हापूर या नियोजित संस्थेस संस्था नोंदणी करणेबाबत आपल्या संस्थेची काही हरकत असलेस ती निम्न स्वाक्षरीकार या कार्यालयात दिनांक ३१/०७/२०२४ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता अथवा तत्पूर्वी आपण आपले प्रतिनिधी यांचेमार्फत लेखी म्हणणे सादर करावे. सदर दिवशी आपण आपले म्हणणे सादर न केलेस कोणत्याही संस्थेची हरकत नाही असे समजून पुढील योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

स्थळ : कागल
दिनांक : १५/०७/२०२४

सही/- (समीर जांबोटकर)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, ता. कागल, जि. कोल्हापूर



डी. वाय. पाटील शिक्षण संस्था संचलित व महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्न
**डॉ. डी. वाय. पाटील कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, तळसंदे जि. कोल्हापूर** (कॉलेज कोड 15192)
महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी कडून 'अ' दर्जा प्राप्त
**डॉ. डी. वाय. पाटील कृषी महाविद्यालय, तळसंदे जि. कोल्हापूर** (कॉलेज कोड 11141)
महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी कडून 'अ' दर्जा प्राप्त

**प्रवेश सुरू**

या दोन्ही महाविद्यालयांमध्ये **बी. टेक. (कृषि अभियांत्रिकी) व बी. एस्सी. (कृषी)** साठी प्रवेश घेण्यास इच्छुक उमेदवारांनी शैक्षणिक पात्रता, ऑनलाइन व संस्थास्तरीय उपलब्ध जागांचा तपशील, शैक्षणिक शुल्क, वसतिगृह, मेस/कॅन्टीन, बस सेवा इत्यादी. संबंधी माहितीसाठी अनुक्रमे **https://coae.dypgroup.edu.in/** व **https://agri.dypgroup.edu.in/** या संकेतस्थळांना भेट द्यावी. वरील महाविद्यालयांमध्ये बी. टेक. (कृषि अभियांत्रिकी) व बी. एस्सी. (कृषी) प्रवेशासाठी **www.agri2024.mahacet.org** या संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने प्रवेश अर्ज भरणे आवश्यक आहे.

**अधिक माहितीसाठी संपर्क : 9356801183 व 7066944959**